## ६. राष्ट्रिय पशुउत्पादकता अभियानः

केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे पत्र क्र. एफ क्र.३-१/२०१६-एएचटी (एनपीबीबी), नवी दिल्ली, दिनांक ०३.०११.२०१६. अन्वये राष्ट्रीय पशुधन विकास योजना/धवलक्रांती/राष्ट्रीय गोकुल मिशन अंतर्गत राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान (National Mission on Bovine Productivity) या योजनेच्या अंमलबजावणीस सन २०१६-१७ पासुन पुढील ३ वर्षात राबविण्यासाठी व सदर योजनेतील प्रलंबित राहिलेल्या काही बाबी पुढील कालावधीमध्ये पुर्ण करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी प्रदान केलेली आहे.

राष्ट्रीय पशु उत्पादकता अभियान योजनेअंतर्गत केंद्र शासनाने खालील बाबीचा समावेश केलेला आहे.

१. **पशुसंजीवनी :** या योजनेअंतर्गत राज्यातील गायी/म्हशींना टॅगींग करणे तसेच सर्व जनावरांकरिता आरोग्य पत्रिका (नकुल स्वास्थ पत्र) पुरविणे तसेच सर्व जनावरांचा डाटा नॅशनल डाटाबेसवर अपलोड करणे प्रस्तावित आहे.
२. **आधुनिक प्रजनन तंत्रज्ञान :** या योजनेचा उद्देश उच्च वंशावळीच्या व रोगमुक्त गायी/म्हशींची उपलब्धता वाढविणे असुन यामध्ये इन व्हिट्रो फर्टिलायझेशन/मल्टीपल ओहुलेशन व भ्रुण प्रत्यारोपण या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.
३. **ई-पशुहाट (नकुल प्रजनन बाजार) :** या योजनेचा उद्देश देशातील पशु प्रजनन करणा-या संस्था व पशुपालन करणारे शेतकरी यांच्या मध्ये ई-मार्केट व्दारे जनावरांचे खरेदी विक्रीचे व्यवहारास प्रोत्साहन देणे प्रस्तावित आहे.
४. **राष्ट्रीय पशु जनुकीय केंद्र (एनबीजीसी-आयबी) :** या योजनेअंतर्गत देशातील शुध्द देशी गोवंश/म्हैशवंशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय पशु जनुकीय केंद्र स्थापन करणे प्रस्तावित आहे.

सदर योजना राबविण्याचा मुख्य उद्देश आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेल्या शेतक-यांचे आर्थिक उत्पन्न दुप्पट करण्याचा आहे त्याअनुषंगाने केंद्र शासनाने खालील प्रमाणे उद्दीष्ट ठरविलेले आहे.

१. गायी/म्हशींचे दुध उत्पादन व उत्पादकता वाढविणे व त्याकरिता उच्च वंशावळीच्या व रोगमुक्त गायी/म्हशींची संख्या वाढविणे तसेच रोग प्रसारास आळा घालणे.
२. दुधाळ गायी/म्हशींची व त्यांच्यापासुन निर्माण होणारे दुध व दुधाचे पदार्ध यांची गुणवत्ता वाढविणे.
३. सॅनेटरी व फायटोसॅनेटरी बाबींची पुर्तता करुन जनावरांच्या व पशुजन्य पदार्थांची खरेदी विक्रीला प्रोत्साहन देणे.
४. ई-मार्केट व्दारे पशु प्रजनन करणा-या संस्था व पशुपालन करणारे शेतकरी यांच्या मध्ये समन्वय साधुन त्याव्दारे जनावरांचे खरेदी विक्रीचे व्यवहारास प्रोत्साहन देणे.

५. मा. प्रधानमंत्री, भारत सरकार यांनी देशातील शेतक-यांचे आर्थिक उत्पन्न सन २०२२ पर्यंत दुप्पट करण्याचे उद्दीष्ट ठरविलेले असल्याने सदर योजना कार्यन्वीत करणे.

| Year: 2017-18 | | Funds sanctioned by GoI on 13.07.2017 | | | | Funds released by GoI on 16.08.2017 | | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Sub components of Pashusanjivani | Phy | Fin (Rs. In Lakh) | | | Phy | Fin (Rs. In Lakh) | | | |
| | | | Central (60%) | State (40%) | Total | | Central (60%) | State (40%) | Total | |
| 1 | Procurement of Ear tags | 54 Lakh | 281.44 | 187.62 | 469.06 | 54 Lakh | 136.75 | 91.17 | 227.92 | Initially 22 Lakh ear tags of Rs. 216.70 Lakh procured from AI Service Charges of MLDB |
| 2 | Health Cards (Nakul Swasthya Patra) | 54 Lakh | 142.86 | 95.24 | 238.10 | 54 Lakh | 65.12 | 43.41 | 108.53 | Supply order is placed for printing of 54 Lakh health cards @ Rs. 1.904 per card and Rs. 102.72 Lakh & Rs.15.85 Lakh for printing of INAPH registers is incurred from AI Service Charges of MLDB. |
| 3 | Ear Tag applicators | 4861 | 18.89 | 12.60 | 31.49 | 4861 | 10.25 | 6.83 | 17.08 | Total 4861 tag applicators of Rs. 35.73 Lakh procured from AI Service Charges of MLDB |
| 4 | Tablet/ Computerization | 4861 | 154.23 | 102.82 | 257.05 | 4861 | 87.88 | 58.59 | 146.47 | Supply order of 7126 Tablet PC is issued @ Rs. 5699/- per unit. |
| | Total | | **597.42** | **398.28** | **995.70** | | **300.00** | **200.00** | **500.00** | |

Note: Initially Rs. 371.00 Lakh has been incurred from AI service charges of MLDB and Rs.342.32 Lakh has been recouped in AI Service Charges of MLDB and Rs. 157.68 Lakh remains unspent under this scheme.
Utilization Certificate of Rs. 342.32 Lakh (Central: Rs. 205.39 Lakh and State: Rs. 135.93 Lakh) has been submitted.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ**
**अकोला**